नियमीत फौजदारी खटला क्र. **९४/२०२३**
निशाणी क्र. **३४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रियांका प्रशांत गावंड** |
| वय सुमारे | : | ४९ वर्षे, व्यवसाय : पोलीस पाटील |
| निवासस्थान | : | मु. नवेदर कोळगांव, पो. सासवणे, ता. अलिबाग |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. २५/०४/२०२३ रोजी मला पोलीसांनी फोन करुन बोलावले होते. मी पोलीस ठण्यात गेले. तेथे आम्ही दोन पोलीस पाटील होतो व तेथे आरोपी अनिल अशोक नाईक हजर होता. अनिल नाईक याने सांगितले की, आम्ही लोखंडी शिगा चोरल्या होत्या व एका इसमाला विकल्या आहेत. ते बोडणी येथील एका भंगारवाल्याला विकले होते. ५:३० वाजता पोलीसांनी पंचनामा सुरु केला. मला तो पंचनामा दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी—१** म्हणजेच **निशाणी क्र. ३५** देण्यात येते.

०२. त्यानंतर पोलीस ठाण्याची जीप घेवून आम्ही भंगारवाल्याच्या दुकानामध्ये गेलो. जीपमध्ये मी, दुसरे पोलीस पाटील, आरोपी अनिल अशोक नाईक, दोन पोलीस होते. गाडी भंगारवाल्याच्या दुकानाकडे नेण्याकरीता आरोपी ड्रायव्हरला मार्ग सांगत होता. आरोपीने ज्या भंगारवाल्याला माल विकला तो भंगारवाला शिवमुरत यादव दाखवला. त्या ठिकाणी पोलीसांनी तो माल जप्त केला

व आमच्या समक्ष सिलबंद केला. सदरचा माल हा ३०० किलो वजनाचा होता. त्या ठिकाणी पोलीसांनी सदर माल जप्त केला व पंचनामा केला. तो पंचनामा मला दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. २ वर माझी, दुसरे पोलीस पाटील व आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–२** म्हणजेच **निशाणी क्र. ३६** देण्यात येते.

०३. त्या ठिकाणी पोलीसांनी फोटो काढले. आता मला दाखवण्यात आलेले दोन फोटो तेच आहे. फोटोमध्ये लोखंडी शिगा दिसत आहेत. सदर शिगा पोलीसांनी जप्त केल्या. फोटोंना **आर्टीकल** ‘**अ**’ व ‘**ब**’ देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकेन. आज रोजी आरोपी कोर्टात हजर नाही. (आरोपीच्या गैरहजेरी माफीचा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे.)

**सरतपास पूर्ण**.

<u>**उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ करीता वकील श्री. प्रफुल्ल पाटील यांचेमार्फत**</u> :

०४. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस पाटील म्हणून काम करते. मी सन २०११ पासून पोलीस पाटील म्हणून काम करते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटील म्हणून नेमणूक होण्याकरीता संबंधित पोलीस ठाण्याची शिफारस लागते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटलांची महिन्यातून एकदा पोलीस ठाण्यात मिटींग होते. हे म्हणणे खरे आहे की, अनेक कामांकरीता आम्हाला पोलीस ठाण्यात जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, बऱ्याच वेळा मी पंचनाम्यावरील साक्षीदार म्हणून कोर्टात आलेले आहे.

०५. मला पोलीस ठाण्यातून ५:०० वाजता फोन आला होता. आम्ही

पोलीस ठाण्यात गेल्यानंतर आरोपीला पोलीसांनी कस्टडीतून बाहेर काढले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने निवेदन दिले त्यावेळी तो पोलीसांच्या ताब्यात होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्याच्या हातात बेड्या होत्या. पोलीस ठाण्यात पंचनामा ५:३० वाजता सुरु झाला. निवेदन १५ मिनिटांत दिले होते. आरोपीने निवेदन देण्यास ५:१५ वाजता सुरुवात केली. आरोपीने पाच मिनिटे निवेदन दिले होते.

०६. मांडवा पोलीस ठाणे ते भंगारवाल्याचे दुकानातील अंतर ५ ते १० मिनिटांचे आहे. भंगारवाल्याच्या दुकानात आम्ही ५:३० वाजता पोहोचलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पोहोचल्यावर लगेच पंचनामा सुरु केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी जीपमध्ये मागील सीटवर बसला होता. घटनास्थळ भंगाराचे दुकान ही मोकळी जागा होती. ती जागा कोणाच्या मालकीची होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला फोनवर सांगितले होते की, चोरीचा गुन्हा दाखल झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला सांगितले होते की, शिगा चोरीला गेलेल्या आहेत व त्या आपल्याला पंचनाम्याने जप्त करायच्या आहेत.

०७. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर पोलीस ठाण्यात सह्या केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने निवेदन दिले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने निवेदन दिले व त्याप्रमाणे मुद्देमाल भंगाराच्या दुकानातून जप्त करण्यात आला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटील असल्याने पंचनामा झाल्यासंदर्भात खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र. १ ते ३ चा उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ४ करीता वकील श्रीमती उनेजा शेख यांचेमार्फत</u>** :

०८. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पोलीसांना मदत करतो. भंगाराच्या दुकानासंदर्भातील कागदपत्र पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याकरीता गेले होते व माझ्यासमक्ष आरोपीने ३०० किलो वजनाच्या लोखंडी सळया काढून दिल्या हे मी खोटे सांगत आहे. माझ्या सहीच्या खाली माझे नाव लिहीलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र. ४ चा उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ५ करीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत</u>** :

उलटतपास नाकारला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१९/११/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.